# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 23 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २३ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- पी एम स्वनिधी क्रेडिट कार्ड योजनेचा पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ
- केंद्र सरकारचा सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन पुरस्कार लेफ्टनंट कर्नल सीता शेळके यांना जाहीर
- एसटी महामंडळाची 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे-एसटी संगे तीर्थाटन' योजना

आणि

- गुरू तेगबहादूर यांच्या स्मरणार्थ नांदेड इथं नियोजित हौतात्म्य सत्संग सोहळ्याची तयारी पूर्ण

****

'प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना' अर्थात पी एम स्वनिधी क्रेडिट कार्ड योजनेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केरळमध्ये तिरुवअनंतपुरम् इथं शुभारंभ केला. छत्रपती संभाजीनगर इथले निवडक अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी आभासी पद्धतीनं त्या कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी छत्रपती संभाजीनगर शहरातल्या पाचशे बत्तीस पथविक्रेत्यांना कर्जाचं वितरण करण्यात आलं.

****

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९व्या जयंती निमित्त देश त्यांना आदरांजली वाहत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनीही नेताजींना आदरांजली

वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांना समाज माध्यमावर अभिवादन केलं आहे.

****

केंद्र सरकारच्या नेताजी सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड झाली आहे. केरळमधे वायनाड इथं २०२४ मधे भूस्खलनामुळे ओढवलेल्या आपत्तीत शेळके यांनी अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्याने बचावकार्यात लक्षणीय योगदान दिलं होतं. ५ लाख रुपये आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. या पुरस्काराबद्दल सीता यांचे वडील अशोक शेळके यांनी आकाशवाणीशी बोलतांना आनंद व्यक्त केला. ते म्हणाले –

**बाईट – अशोक शेळके**

****

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शतकपूर्ती जयंतीनिमित्त राज्य परिवहन महामंडळानं आजपासून, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे – एसटी संगे तीर्थाटन' ही योजना सुरू केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार ही योजना राज्यातल्या २५१ आगारांत एकाच वेळी राबवण्यात येणार आहे. ही योजना 'स्वस्त आणि सुरक्षित' या ब्रीदवाक्यावर आधारित असून, सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल अशा दरात धार्मिक पर्यटनाची अनुभूती देणं हा तिचा मुख्य उद्देश असल्याचं परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे.

****

बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठाकरे यांना आदरांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसेनेकडून अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवण्याची घोषणा शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यातल्या २९ महापालिका आणि ३९४ नगर परिषदांमध्ये 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबवण्यासाठी नगर परिषदांना १

कोटी आणि महापालिकांना ३ कोटी रुपये निधी देणार असल्याचं, शिंदे यांनी सांगितलं.

****

प्रजासत्ताक दिनी दिल्लीत होणाऱ्या पथसंचलनाची आज रंगीत तालीम झाली. सकाळी साडे दहा वाजता विजय चौकातून सुरू झालेल्या या संचलनाचा लाल किल्ल्यावर समारोप झाला. यंदा या संचलनात महाराष्ट्राच्या वतीनं 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी २५ जानेवारीला सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा एकशेतिसावा भाग असेल.

****

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या हौतात्म्य सत्संग वर्षाचं औचित्य साधून, आज नांदेडच्या पवित्र तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब इथे एका भव्य आणि विशेष कीर्तन सोहळा पार पडला. ३५० शालेय विद्यार्थ्यांनी एका सुरात केलेलं, श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या 'शबद गुरबानी'चं गायन, हे या सोहळ्याचं मुख्य आकर्षण होतं. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक सोहळ्याला भाविक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

नांदेडच्या मोदी मैदानावर उद्या आणि परवा दोन दिवस हा हौतात्म्य सत्संग सोहळा होणार असून, यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातल्या अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच अनेक मान्यवर या सोहळ्यासाठी नांदेड इथं येणार आहेत.

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नांदेड तालुक्यातल्या सगळ्या शाळांना उद्या, चोवीस तारखेला सुटी जाहीर करण्यात आली आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येनं उपस्थित राहण्याचं आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नागरिकांना केलं आहे. ते म्हणाले –

**बाईट – जिल्हाधिकारी राहुल कर्डिले**

दरम्यान, या सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांची आणि प्रवाशांची संभाव्य गर्दी लक्षात घेत, रेल्वे प्रशासनानं २४ तारखेला मुंबई, चंडीगड आणि दिल्लीच्या हजरत निजामुद्दीन स्थानकांवरून नांदेडसाठी विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय

घेतला आहे. तसंच कार्यक्रम स्थळी जाण्यासाठी मोफत वाहनांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

****

येत्या २५ तारखेला पाळल्या जाणार असलेल्या सोळाव्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या पार्श्वभूमीवर आज मंत्रालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विशेष कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता यांनी उपस्थितांना मतदार दिनाची शपथ दिली.

नांदेड इथंही राष्ट्रीय मतदार दिनाच्या पार्श्वभूमीवर मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रतिज्ञा घेतल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

धाराशिवच्या जिल्हाधिकारी कार्यालयातही आज मतदार दिनाच्या औचित्यानं कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी मतदार शपथ घेतली.

छत्रपती संभाजीनगर इथं येत्या मंगळवारी २७ तारखेला मतदार दिनानिमित्त कार्यक्रम होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शतकोत्तर रौप्य जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर इथे येत्या २७ आणि २८ जानेवारीला राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. 'भारतीय प्रबोधन आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' या विषयावर आधारित ही परिषद शहरातल्या शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात होणार आहे. या परिषदेचं बीजभाषण सुप्रसिद्ध विचारवंत डॉक्टर नीरज हातेकर करणार असून अन्य मान्यवर वक्तेही आपले विचार मांडणार आहेत.

****

बदलापूर इथल्या बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीला आज कल्याण न्यायालयात हजर करण्यात आलं. न्यायालयानं या आरोपीला येत्या २७ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, राज्यात सर्व प्रकारच्या गुन्हेगारांनी उच्छाद मांडला असून सरकार आणि कायदा हतबल झाल्याची टीका, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

बदलापूर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी सरकारनं कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा इशाराही सपकाळ यांनी दिला आहे.

****

जकार्ता इथं सुरू असलेल्या इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताची पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन यांचं आव्हान संपुष्टात आलं आहे. आज झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात या दोघांनाही प्रतिस्पर्धी खेळाडूंकडून पराभव पत्करावा लागला.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेत दुसरा सामना आज रायपूर इथं खेळवला जाणार आहे. सायंकाळी सात वाजता हा सामना सुरू होईल. मालिकेत पहिला सामना जिंकून भारत एक शून्यने आघाडीवर आहे.

****